**नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र**
**पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.**

**प्रेस नोट**

**दिनांक ०५/१२/२०२३ (मंगळवार)**

---

## मोहाफुलाची अवैद्य दारु तयार करुन विक्री करणाऱ्यास केले १ वर्षाकरीता स्थानबध्द

पो.स्टे. रामटेक – ता. पारशिवनी अंतर्गत साटक गावातील रामा देवचंद कुभलकर वय ३३ वर्ष यास मा. जिल्हाधिकारी नागपूर यांनी दि. ०२.१२.२०२३ रोजी आदेश पारीत करुन त्यास १ वर्षाकरीता स्थानबध्द केले आहे.

रामा देवचंद कुभलकर वय ३३ वर्ष हा त्याचे गावात मोहफुलाची अवैद्य दारु गाळुन विक्री करीत होता त्याचेवर पोलीसांनी वारंवार कायदेशिर कार्यवाही केली व प्रतिबंधात्मक कार्यवाही करुन सुध्दा त्याचे अवैद्य मोहाफुल दारु व्यवसायाला आळा बसत नव्हता उलट त्याच्या व्यवसायात वाढ झाली होती. त्याच्या या अवैद्य व्यवसायामुळे त्या भागात तरुन मुलांमध्ये व्यसनाधिनता वाढत होती व रामा याच्या निडर पणामुळे तेथील लोकांच्या मनात भिती निर्माण झाली होती. त्याच्या अवैद्य व्यवसायाला आळा बसविण्याकरीता ठाणेदार रामटेक यांचे मार्फतीने मा. जिल्हाधिकारी नागपूर यांना एम.पी.डी.ए. अंतर्गत कार्यवाहीकरीता प्रस्ताव सादर केला होता. त्यावरुन मा. जिल्हाधिकारी नागपूर यांनी दि. ०२.१२.२०२३ रोजी रामा देवचंद कुंभलकर वय ३३ वर्ष यास स्थानबध्द करण्यास आदेश पारीत केला होता त्याअन्वये रामा यास दि. ४.१२.२०२३ रोजी मध्यवर्ती कारागृह नागपूर येथे स्थानबध्द करण्यात आले आहे.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक श्री. हर्ष पोद्दार भा.पो.से नागपूर ग्रामिण, अपर पोलीस अधीक्षक श्री. संदिप पखाले यांचे मार्गदर्शात श्री. ओमप्रकाश कोकाटे पो.नि. स्थानिक गुन्हे शाखा नागपूर, पो.स्टे. रामटेक चे ठाणेदार श्री. हृदयनारायण यादव, स.पो.नि. आशिषसिंग ठाकुर, स.फौ. सुरज परमार, निलेश बर्वे, होमेश्वर वाईलकर यांनी केली आहे.

# चोरी

पो.स्टे. रामटेक— दि.०४.१२.२३ रोजी पो.स्टे. रामटेक ला मोहम्मद तनविर मो.अफजल हंसारी, वय ३६ वर्शे रा महाजन वाडी मनसर यांनी तक्रार केली की, दि.०४.१२.२०२३ रोजी सकाळी ०९:०० वा. कामावर गाडी घेवून जाणे असल्याने त्यांचेकडील हायड्रा गाडी क्र. एमएच ४० बिजे २९३८ व एमएच ३६ एल १००५ या दोन्ही गाडयाची कॅबिन व बॅटरी बॉक्सची पाहणी केली असता लॉक तुटलेले दिसले त्याची शहानिशा केली परंतु बॅटऱ्या दिसल्या नाही. बॅटऱ्याचे वर्णन असे की, हायड्रा गाडीला असलेले अल्ट्रा पावर बॅटरी कि.८०००/— रू चा माल कोणीतरी अज्ञात चोराने तसेच मनसर येथील सुनिल मदन साखरे, रा.मनसर यांच्या ट्रक्टरची बॅटरी SF SONFC कंपनीची कि. ७८००/— तसेच क्रिष्णा दशाराम ठाकरे, वय ५२ वर्ष, रा.नित्यानंद नगर मनसर यांची ट्रक्टर क्र. एमझेड व्ही ३७१० यांची एक्साड कंपनीची बॅटरी कि.८०००/— तसेच मनसा मसुतूर रहमान पटेल यांची गाडी क्र.एमएच ४० एन ४४३३ एस मोडेल ट्रक ची किरण कंपनीची दोन बॅटरी कि. ६०००/— अशा वर्णनाच्या बॅटऱ्या चोरी गेल्या आहे. सदरप्रकरणी पो.स्टे. रामटेक येथे ९०५/२३ कलम ३७९ भा.द.वि. अन्वये गुन्हा नोंद असुन पुढील तपास सफौ/२१० संजय पायक मो.क्र. ८८३०९ २३३१० हे करीत आहे.

# फसवणुक

पो.स्टे. काटोल – पो.स्टे. काटोल अंतर्गत येनवा येथील वयोवृध्द श्री. लक्ष्मणराव रतनसाव उदापुरकर वय ६९ वर्ष यांना आरोपी १) ताराचंद वाघमारे रा. येनवा २) अंकीत कुरई ३) अभिनव चोपडे दोन्ही रा. नागपुर ४) तुषार खडसे रा. काटोल यांनी एका सरकारी स्किम मध्ये महीन्याचे १५,०००/ रूपये पेशन मिळते असे सांगुन लक्ष्मणराव या वृध्दाकडुन त्यांचे सर्व ओरीजनल कागदपत्रे घेवुन त्यांना वारंवार नागपुर येथे बोलावुन वेगवेगळया कागदांवर सहया घेतल्या तसेच सर्व आरोपी यांनी आपसी संगणमत करून वुध्दाच्या व इतर लोकांच्या नावाने खालील वर्णनाची वाहने

१. एम.एच.४० सीपी ५३८७ चेतक २४२३ प्रिमीयम– १,५२,४७०
२. एम.एच.४० सीपी १९५५ चेतक २४१३ प्रिमीयम –१,५४,४७०
३. एम.एच.४० सीपी १९५४ चेतक २४१३ प्रिमीयम–१,५२,४७०
४. एम.एच.४० सीपी ५७२१ चेतक २४१३ प्रिमीयम–१,५२,४७०
५. एम.एच.४० सीपी ९८९५ पल्सर १२५ डीटीएस आय–१,१२,८८३
६. एम.एच.४० सीपी ३९१९ चेतक २४१३ प्रिमीयम–१,५४,४७०
७. एम.एच.४० सीपी २५८४ एक्टीव्हा ६ जी एसटीडी– ९०,२९०/
८. एम.एच.४० सीएन ८६९२ एक्टीव्हा ६ जी डीएलएक्स– ९३,२९०
९. एम.एच.४० सीएन ९०३१ एक्टीव्हा ६ जी डीएलएक्स– ९३,२९०
१० एम.एच.४० सीपी ४७६१ शाईन १२५ एम –९६,२७२/
११ एम.एच.४० सीपी १७३२ एक्टीव्हा ६ जी एस.टी.डी – ९०,७६८/
१२ एम.एच.४० सीपी ११७५ एक्टीव्हा ६ जी एसटीडी – ९०,७६८/
१३ एम.एच.४० सीपी २५७७ एक्टीव्हा ६ जी एसटीडी –– ९०,७६८ /
१४ एम.एच.४० सीएन ८९११– एक्सेस १२५ डीआयएससी – ९६,६४१/
१५ एम.एच.४० सीपी ५७९९ स्प्लेन्डर प्लस – ९३,५४८ /

असा एकुण १७,१७,३४६ रूपयांची दुचाकी वाहने फिर्यादी यांचे नावे विविध फायनांस कंम्पनी कडुन लोनवर खरेदी करून फिर्यादीला न कळवता परस्पर दुसऱ्यांना विक्री केल्या आहेत किवा कुठेतरी ठेवुन फिर्यादीची फसवणुक केली आहे. अशा फिर्यादीच्या अर्ज चौकशीवरुन पो.स्टे. काटोय येथे अप.क्र. १३७६/२३ कलम ४२०,४०६,४०९,१२० भा. द.वि. अन्वये गुन्हा नोंद केला असुन सदर गुन्हयाचा तपास पोउपनि/ परमेश्वर आगासे पो.स्टे. काटोल मो. क्र. ८४६४२८३९२५ हे करीत आहे.

## घरफोडी

पो.स्टे. खापा – पो.स्टे. खापा अंतर्गत बिचवा येथील ंकर सोनबा कोचे वय ७३ वर्ष हे दि ०३/१२/२०२३ रोजी सकाळी १०/०० चे सुमारास घराचे दाराला कुलुप लावुन पत्नी व मुलगी असे मिळुन शेतामध्ये शेतीचे काम करण्याकरीता गेले होते व सायंकाळी ०५/३० वा चे सुमारास शेतातील कामे संपवुन आपले घरी परत आले असता घराचे बाथरुमला असलेला दरवाजाउघडा दिसला फिर्यादीचे मुलीने घरी ठेवलेले पैसे पाहले असता त्यांचे मुलीचे हॅन्ड बॅग मधील ४००० रु दिसुन आले नाही. व घराचे भिंतीला असलेल्या रॅक मधील पैसे जमा करायचे मातीचे मटके दिसले नाही. नंतर सायंकाळी ०६/३० वा चे सुमारास फिर्यादीचे घराचे मागे राहणारा सुनिल पुनाराम चौधरी हा शेंतातुन घरी आला असता त्याचे मुलगा नामे प्रतिक सुनिल चौधरी वय ११ वर्ष हा त्याचे वडीलांना सांगु लागला की आपले गावात राहणारा वसंता गजभिये हा शंकर बावाजीचे घरी गेला होता व नंतर घरी लावलेले कुलुप तोडत होता त्याला हटकले असता तो तेथुन पळुन गेला असे सांगीतल्याने शंकर सोनबा कोचे यांची खात्री पटली की,त्यांचे घरुन ४००० हजार रुपये व मातीचे मटक्यातील १५०० रुपये असे मिळुन ५५०० रुपयाची चारी वसंता गजभिये यांनी केली असावी. यावरुन आरोपीविरुध्द पो.स्टे. खापा येथे कलम ४५४,३८० भादवी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असुन पुढील तपास सफौ प्रमोद बनसोड ब.न. ४६३ पोस्टे खापा मो.न. ९९२३४ १०२२३ हे करीत आहे.

# घरफोडी

पो.स्टे. बोरी – बोरी येथील सौ वंदना  विजय मानकर वय ३५ वर्श रा. जुनी वस्ती बुटीबोरी वार्ड क्र मो.न. ८८८८१३७१६० ह्या आपल्या घराला कुलुप लावून त्याचे पतीसह त्यांचा मुलगा व मुलगी यांना वडनेर येथे हॉस्टेलवर सोडण्याकरीता  गेले असता कोणीतरी अज्ञात चोराने त्यांचे घरातील  १)सोन्याची पोत (लांब मंगळसुत्र) ८ ग्रॅम कि ९६००/–रू २)सोन्याची आंगठी ५ ग्रॅम कि ६०००/–रू ३)सोन्याचे कानातले ४ ग्रॅम कि ४८००/–रू ४) कानातले १ग्रॅम कि १२००/–रू असे एकुण १८ ग्रॅम सोने एकुण २१,६००/–रू चा माल व नगदी २५००० रू असा एकुण ४६,६००/– रुपयांचा माल चोरी गेला आहे. सदर प्रकरणी पो.स्टे. बोरी येथे अप.क्र. ९२१/२०२३ कलम ४५४,४५७,३८० भादवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असुन पुढील तपास :–पोहवा/ ६२० विनोद जाधव पो.स्टे. बोरी मो.क्र ७६२०६१२३९७ हे करीत आहे.